International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# टी –ट्वेन्टी क्रिकेट २०१६या स्पर्धेमध्ये रनींग बिटवीन द विकेटसाठी लुक इन लुक आउट व स्मॉल कर्व पद्धतींपैकी कोणत्या पद्धतीचा फलंदाजानी सर्वाधिक वापर केला याचा विश्लेषणात्मक अभ्यास

**श्री. सुचय सुरेश खोपडे [1], डॉ. शरद व्ही. बनसोडे[2]**
*[1]पी. एच. डी. संशोधक विद्यार्थी*
*[2]पी.एच.डी.मार्गदर्शक आणि संचालक,*
*क्रीडा व शारीरिक शिक्षण, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर*
***Corresponding Author - श्री. सुचय सुरेश खोपडे***
**DOI - 10.5281/zenodo.10939492**

***सारांश:***

*प्रस्तुत संशोधनात संशोधकाने टी-ट्वेन्टी क्रिकेट २०१६या स्पर्धेमध्ये रनींग बिटवीन द विकेटसाठी लुक इन लुक आउट व स्मॉल कर्व पद्धतींपैकी कोणत्या पद्धतीचा फलंदाजानी सर्वाधिक वापर केला आहे याचा विश्लेषणात्मक अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधनात जगातील सर्व क्रिकेट खेळाडूंची जनसंख्या म्हणून निवड करण्यात आली आहे यामध्ये प्रस्तुत संशोधनात प्रासंगिक पद्धतीने २०१६ या वर्षात टी-ट्वेन्टी क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंची निवड केली आहे. संशोधनाच्या विविध पद्धती असून प्रस्तुत संशोधन संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा वापर करून टी-ट्वेन्टी क्रिकेट २०१६या स्पर्धेमध्ये रनींग बिटवीन द विकेटसाठी लुक इन लुक आउट व स्मॉल कर्व पद्धतींपैकी कोणत्या पद्धतीचा फलंदाजानी सर्वाधिक वापर आहे याचा विश्लेषणात्मक अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधनात विश्लेषणात्मक अभ्यास केल्यावर असे दिसून आले की फलंदाज पळताना लुक इन लुक आउट या पद्धतीचा वापर स्मॉल कर्व पद्धतींपेक्षा जास्त प्रमाणात करतात.*

***Keywords: रनींग बिटवीन द विकेट, लुक इन लुक आउट, स्मॉल कर्व***

**प्रस्तावना :**

क्रिकेट खेळताना निरनिराळी कौशल्य वापरावी लागतात.यामध्ये बॅटिंग, बॉलिंग, फिल्डिंग या कौशल्यांचा समावेश होतो तसेच यामध्ये रनिंग बिटवीन द विकेट या कौशल्यांचासुद्धा समावेश होतो.हे कौशल्य करताना दिशाभिमुखता, वेग या घटकांचा समावेश होतो. १९८३च्या विश्वचषक अंतिम सामन्यामध्ये मध्ये भारताने ७८ धावा चौकार व षटकाराच्या मदतीने जमवल्या व २० अवांतर धावा केल्या व पळून ८५ धावा काढल्या. २०११च्या विश्वचषक अंतिम सामन्यामध्ये भारताने ११२ धावा चौकार व षटकाराच्या मदतीने

जमवल्या व १५ अवांतर धावा केल्या व पळून १५२ धावा काढल्या. १९८०च्या दशकातले खेळाडू पळून जास्त धावा करत नव्हते ते चौकार व षटकाराच्या मदतीने धावा करत होते.पण आधुनिक क्रिकेटमध्ये १-१धावेला महत्व आहे. सुनील गावस्कर यांच्या मते खेळाडूला चांगली खेळी करायची असेल तर चोरून धावा घेणे महत्त्वाचे आहे यामुळे विरोधी संघावर दबाव येतो. तसेच आधुनिक क्रिकेटमध्ये रनिंग बिटवीन द विकेट या कौशल्यांचा विविध पद्धतींचा वापर होत आहे.या पद्धतीत लुक इन लुक आउट व स्मॉल कर्व पद्धत यांचा समावेश होतो.

**समस्या स्पष्टीकरण:**

क्रीडा कार्यमान वेगवेगळ्या घटकांवर अवलंबून असते. यापैकी एक अतिशय महत्वाचा घटक म्हणजे त्या खेळातील कौशल्य कार्यमान होय. वेगवेगळ्या पद्धती वापरून खेळाच्या गतीमध्ये व कौशल्य कार्यमानामध्ये काही बदल होतो काय ? दोन्ही पद्धतीपैकी खेळाडू कोणती कौशल्य वापरतात ? या पद्धतीपैकी कोणती पद्धत आधुनिक क्रिकेटला उपयुक्त आहे हे पाहणार आहोत. या संशोधनामुळे नवसीख्या खेळाडूंना योग्य दिशा मिळू शकते . त्यासाठी संशोधकाने रानिंग बिटवीन द विकेट या कौशल्याचा विश्लेषनात्मक अभ्यास करण्याचे योजले आहे.

**गरज आणि महत्व:**

1. या संशोधनामुळे खेळाडूंना व मार्गदर्शकांना मदत होईल.
2. खेळातील सहभाग वाढेल.
3. खेळाडूंना कोणती पद्धत उपयुक्त हे कळेल.
4. मार्गदर्शकांना कोणत्या पद्धती फायदेशीर आहे हे कळेल.

**उदिष्ट्ये:**

प्रस्तुत संशोधन संशोधकाने टी-ट्वेन्टी क्रिकेट २०१६या स्पर्धेमध्ये रनींग बिटवीन द विकेटसाठी लुक इन लुक आउट व स्मॉल कर्व पद्धतींपैकी कोणत्या पद्धतीचा फलंदाजानी सर्वाधिक वापर केला आहे हे तपासणे हे होते .

**संशोधन पद्धती:**

संशोधनाच्या विविध पद्धती असून प्रस्तुत संशोधन संशोधकाने क्रिकेट २०१६या स्पर्धेमध्ये रनींग बिटवीन द विकेटसाठी लुक इन लुक आउट व स्मॉल कर्व पद्धतींपैकी कोणत्या पद्धतीचा फलंदाजानी सर्वाधिक वापर आहे याचा विश्लेषणात्मक केला अभ्यास करणारे असल्यामुळे या संशोधनात संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

सर्वेक्षण पद्धतीत समस्या आणि समस्येचे कारण यांचा सहसंबंध दाखवण्यात येतो. ह्या संशोधनातून एखादी घटना,परीस्थिती,समस्या यांचे पद्धतशीर वर्णन केले जाते व त्यातून विविध घटकांची माहिती दिली जाते.संशोधनात सर्वेक्षण

पद्धतीचा व्यापक प्रमाणात वापर करण्यात येतो. वर्णनात्मक संशोधन पद्धतीमध्ये ज्या माहितीचा वापर करण्यात येतो, अगदी अशाच प्रकारची माहिती सर्वेक्षण पद्धतीला पण लागू पडते, त्यामुळे या पद्धतीस वर्णनात्मक पद्धती असेही समजण्यात येते. या पद्धतीमध्ये वर्तमान काळातील माहिती घेण्यात येते.

**जनसंख्या:**

प्रस्तुत संशोधनात जगातील सर्व क्रिकेट खेळाडूंची जनसंख्या म्हणून निवड करण्यात आली आहे.

**न्यादर्श:**

प्रस्तुत संशोधनात प्रासंगिक पद्धतीने २०१६ या वर्षात टी-२०क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंची निवड केली आहे.

**माहितीचे स्रोत:**

प्रस्तुत संशोधन हे टी-२०क्रिकेट २०१६ मधील रनींग बिटवीन द विकेट या कौशल्याचा विश्लेषणात्मक अभ्यासावर आधारित आहे. रनींग बिटवीन द विकेट या कौशल्याचा अभ्यास करण्याकरिता सामन्यांच्या चित्रफित गोळा केल्या व त्याद्वारे सामन्यांचे विश्लेषण करण्यात आले.


**संख्याशास्त्रीय विश्लेषण :**

संशोधन अभ्यासात शास्त्रीय विश्लेषणाला विशेष महत्व असल्याने संखिकीच्या वाढत्या ज्ञानाचा त्यात विशेष उपयोग करून घेण्यात आलेला आहे . संकलित माहितीचे विश्लेषण केले आहे.

**कोष्टक १**

**रनींग बिटवीन द विकेटसाठी (दुहेरी धावा काढण्यासाठी) लुक इन लुक आउट व स्मॉल कर्व पद्धतींपैकी कोणत्या पद्धतीचा फलंदाजानी सर्वाधिक वापर केला हे दर्शवणारे कोष्टक**

| | | Small Curve | | | | Look in Look Out | | | | OA Total SC | OA Total LI LO |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SN | Match No | PP | MO | SO | Total (2) | PP | MO | SO | Total (2) | | |
| | Runs | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |
| 1 | CPL I | 2 | 0 | 0 | 2 | 4 | 12 | 0 | 16 | 2 | 16 |
| 2 | CPL II | 0 | 4 | 0 | 4 | 8 | 16 | 4 | 28 | 4 | 28 |
| 3 | CPL III | 4 | 0 | 0 | 4 | 2 | 4 | 0 | 6 | 4 | 6 |
| 4 | IPL IV | 0 | 2 | 0 | 2 | 14 | 24 | 10 | 48 | 2 | 48 |
| 5 | IPL V | 0 | 2 | 0 | 2 | 6 | 8 | 0 | 14 | 2 | 14 |
| 6 | CC VI | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 2 | 0 | 6 | 0 | 6 |
| 7 | CC VII | 2 | 10 | 0 | 12 | 6 | 2 | 14 | 22 | 12 | 22 |
| | Total | 8 | 18 | 0 | 26 | 44 | 68 | 28 | 140 | 26 | 140 |





**आकृती १: रनींग बिटवीन द विकेटसाठी (दुहेरी धावा काढण्यासाठी) लुक इन लुक आउट व स्मॉल कर्व यापैकी कोणती पद्धत जास्त वापरली हे दर्शवणारे वर्तुळ आलेख**

कोष्टक १मध्ये दिलेल्या सांखिकी विश्लेषणामध्ये एकूण सात सामन्यांमध्ये फलंदाजांनी दुहेरी धावा १६६ काढल्या आहेत. त्यापैकी १४० धावा या लुक इन लुक आउट पद्धतीने व २६ धावा स्मॉल कर्व पद्धतीने काढल्या आहेत यावरून असे दिसून येते की फलंदाज दुहेरी धावा पळताना लुक इन लुक आउट या पद्धतीचा उपयोग जास्त प्रमाणात करतात.

**कोष्टक २**

**रनींग बिटवीन द विकेटसाठी (तिहेरी धावा काढण्यासाठी) लुक इन लुक आउट व स्मॉल कर्व पद्धतींपैकी कोणत्या पद्धतीचा फलंदाजानी सर्वाधिक वापर केला हे दर्शवणारे कोष्टक**

| | | Small Curve | | | | Look in Look Out | | | | OA Total SC | OA Total LI LO |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SN | Match No | PP | MO | SO | Total (2) | PP | MO | SO | Total (2) | | |
| | Runs | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 |
| 1 | CPL I | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 3 | 0 | 3 |
| 2 | CPL II | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 6 | 0 | 6 | 0 | 6 |
| 3 | CPL III | 0 | 0 | 0 | 0 | 9 | 3 | 0 | 12 | 0 | 12 |
| 4 | IPL IV | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 3 | 0 | 6 | 0 | 6 |
| 5 | IPL V | 0 | 0 | 0 | 0 | 9 | 0 | 0 | 9 | 0 | 9 |
| 6 | CC VI | 0 | 0 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | 0 | 6 |
| 7 | CC VII | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | Total | 0 | 0 | 0 | 0 | 27 | 12 | 3 | 42 | 0 | 42 |




**आकृती २: रनींग बिटवीन द विकेटसाठी (तिहेरी धावा काढण्यासाठी) लुक इन लुक आउट व स्मॉल कर्व यापैकी कोणती पद्धत जास्त वापरली हे दर्शवणारे वर्तुळ आलेख**

कोष्टक २ दिलेल्या सांखिकी विश्लेषणामध्ये एकूण सात सामन्यांमध्ये फलंदाजांनी पळून तिहेरी धावा एकूण ४२ काढल्या आहेत. त्यापैकी ४२धावा या लुक इन लुक आउट पद्धतीने व ० धावा स्मॉल कर्व

पद्धतीने काढल्या आहेत यावरून असे दिसून येते की फलंदाज तीन पळताना लुक इन लुक आउट या पद्धतीचा उपयोग जास्त प्रमाणात करतात.

**चर्चा:**

वरील सांखिकी विश्लेषणावरून असे दिसून येते की फलंदाज २ व ३ धावा पळताना लुक इन लुक आउट या पद्धतीचा वापर स्मॉल कर्व पद्धतीपेक्षा जास्त प्रमाणात करतात.

**निष्कर्ष:**

प्रस्तुत संशोधन हे टी-ट्वेंटी क्रिकेट २०१६ मधील रनींग बिटवीन द विकेट या कौशल्याचा विश्लेषणात्मक अभ्यासावर आधारित होते. रनींग बिटवीन द विकेट या कौशल्याचा अभ्यास करण्याकरिता सामन्यांच्या चित्रफित गोळा केल्या व त्याद्वारे सामन्यांचे विश्लेषण करण्यात आले. क्रिकेटमध्ये रनींग बिटवीन द विकेट या कौशल्याचा लुक इन लुक आउट व स्मॉल कर्व या दोन पद्धती आहेत व त्यावरून असे दिसून आले की फलंदाज पळताना लुक इन लुक आउट या पद्धतीचा वापर हा स्मॉल कर्व पद्धतीपेक्षा जास्त प्रमाणात करतात.

**शिफारसी:**

सदर संशोधन हे टी-२०क्रिकेट पुरतेच मर्यादित होते परंतु एकदिवसीय व कसोटी क्रिकेटसाठी सुद्धा असे संशोधन करता येईल.

**संदर्भसूची:**


1. ***स .पटेल (२००९)*** *Devlopment of batting skill test for jr. cricketrs of district level*
2. ***हाडसन आणिली(१९७५)*** *कॉलेज महिलांच्या बास्केटबॉल मधील एका हाताने करावयाच्या फ्री थ्रो चे व्ही.डी.ओ द्वारे विश्लेषण करणे.*
3. ***उमा राजकुमार (२०१३)*** *विशेष व्यायाम प्रशिक्षण कार्यक्रमाचा १६ वर्षाखालील क्रिकेट खेळाडूंच्या रनींग बिटवीन द विकेट या कौशल्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास*
4. ***महात्मे देवदत्त (२०१५)*** *गोलंदाजी दरम्यानच्या विविध टप्प्यातील हालचालींचा गोलंदाजांच्या लाईन व लेन्थच्या अचूकतेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे*
5. ***नायकवडी सतिश (२०१५)*** *पारंपारिक प्रशिक्षण व विशीष्ट प्रशिक्षण सराव पद्धतीचा क्रिकेटमधील फलंदाजी कौशल्यावर होणाऱ्या परिणामांचा तुलनात्मक अभ्यास करणे*
6. **चद्रकांत रायकर (२०१०)** कॉम्प्लेक्स क्रिकेट प्रशिक्षणाचा क्रिकेट खेळाडूंच्या शारीरिक सुधृढता घटकावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
7. **सच्चिदानंद भिका जाधव (२००८)** आखिल भारतीय आंतरविद्यापीठस्तरीय स्पर्धेतील कुस्ती खेळाडू आणि विद्यापीठाच्या सहभागाचा प्रविण्याचा विश्लेशणात्मक अभ्यास करणे.
8. **फिलीप जॉन (१९६५)** ग्वालेहर येथील उच्च माध्यमिक शाळेतील शारीरिक शिक्षणाचे सर्वेक्षणात्मक अभ्यास